डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि तंत्र विद्यालय, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृतंविला/प्रक्षेत्र/३७९/२०१९ दिनांक:— 16 SEP 2019

—: जाहीर नोटीस :—

कृषि तंत्र विद्यालय, लांजा यांजकडून या विद्यालयाच्या प्रक्षेत्रावरील खालील नमुद केलेली शेती विषयक कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके सोबतच्या प्रपत्रामध्ये मागविणेत येत आहेत. दरपत्रके दि. ३०/०९/२०१९ रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील.

| अ. क्र. | विभाग | कामाची यादी | कालावधी | अंदाजे लागणारे मजुर युनिट |
|---|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्र | भात, नागली काढणी करणे, काकडी, पडवळाचे बी काढणे, साफ करणे, वाळविणे, पडलेली नारळफळे गोळा करणे, काजू बागेची साफसफाई करणे | ०४/१०/२०१९ ते ३१/१०/२०१९ | ७५ |
| २ | प्रक्षेत्र | भुईमूग, वाल, चवळी, कलिंगड, कुळीथ पेरणी करणे, पाणी देणे, नारळ गोळा करणे, चिकू फळे काढणे, काजू बागेची साफसफाई करणे | ०१/११/२०१९ ते ३०/११/२०१९ | ७५ |
| ३ | प्रक्षेत्र | प्रक्षेत्रावरील भुईमूग, चवळी, वाल, कलिंगड, कुळीथ इ. पिकातील गवत काढणे, खते देणे, पाणी देणे, नारळ, चिकू झाडांना तसेच नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देणे, नारळ फळे गोळा करणे | ०१/१२/२०१९ ते ३१/१२/२०१९ | ७५ |

कामासंबंधी अटी व शर्ती सोबत दिलेल्या आहेत.

अधिक्षक,
कृषि तंत्र विद्यालय,
लांजा जि. रत्नागिरी

प्रत प्रसिध्दीसाठी रवाना :—

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली
/— सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

२. कार्यालय नोटीस बोर्ड

## ठेका पध्दतीने कामे करणे संबंधिच्या या कार्यालयाच्या अटी/शर्ती

१. कामाची वेळ सकाळी ८:०० ते १२:०० आणि दुपारी २:१५ ते ५:४५ अशी राहील.

२. ज्या दिवशी ठेकेदार गैरहजर राहाणार त्यावेळी पुर्व सूचना देणे बंधनकारक राहील.

३. प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या सूचनेनुसार करावयाची आहेत.

४. कामाची गरज संपल्यावर कोणत्याही प्रकारची लेखी पूर्वसूचना न देता ठेका पध्दत रद्द केली जाईल

५. ठेकापध्दतीने काम केल्याने या कामाच्या आधारे कायम सेवेत घेण्यासाठी विद्यापीठाकडे अथवा शासनाकडे हक्क सांगता येणार नाही

६. ठेका मंजुरीनंतर अटी व शर्ती मान्य असल्याचा करार लिहून द्यावा लागेल

७. ठेका पध्दतीने नेमलेल्या मजूरांच्या कामाच्या सेवा जेष्ठता नोंदी ठेवण्यात येणार नसून त्यांच्या काम सेवेबाबतची कोणतीही बांधीलकी विद्यापीठ प्रशासनावर अथवा शासनावर राहणार नाही

८. ठेकापध्दतीने नेमलेल्या ठेकेदाराच्या कोणत्याही अटी व शर्ती स्विकारल्या जाणार नाहीत

९. सदर कालावधीत केलेल्या कामाचे बील प्रत्येक महिना पुर्ण झालेवर अदा करण्यात येईल

१०. प्रक्षेत्रावर काम करत असताना कोणत्याही कारणाने व कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सदरील अपघात हे केंद्र जबाबदार राहाणार नाही